# डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री विषयक विचार

**डॉ.रेखा काशिनाथ पसाले** मराठी विभाग प्रमुख आणि सहयोगी प्राध्यापक, आर्ट्स अ‍ॅड कॉमर्स कॉलेज, कासेगाव

---

**प्रस्तावना :**

डॉ बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने महिलांचे उध्दारकर्ते होते. आपल्या पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रिया या गुलामच होत्या. स्त्रियांना गुलमाचीच वागणूक मिळत होती. अगदी उच्चवर्णीय स्त्रिया देखील गुलामीचेच जीवन जगत होत्या. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अस्पृश्यांनंतर स्त्रियाच उपेक्षित वाटत होत्या. मातोश्री रमाबाईला लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात महिलांच्या उन्नती व मुक्तीसाठी लढणारा मी योद्धा आहे. महिलांना या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी मी शेवटच्या क्षणापर्यंत लढेन हे बाबासाहेबांनी त्यांचे बोल खरे करून दाखवले ते राज्यघटनेच्या माध्यमातून. बाबासाहेबांनी राज्यघटनेच्या माध्यमातून महिलांना अधिकार दिले. पुरुषप्रधान संस्कृती आणि मनुवादी विचारसरणीमूळे ज्या महिलांना पुरुषांच्या पायाशी स्थान होते त्या महिला आज पुरुषांच्या बरोबरीने उभ्या राहत आहेत. या मागे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्रीवादी दृष्टीकोन महत्वपूर्ण आहे.

**उद्दिष्टे :**

१.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रियाविषयी विचार अभ्यासणे

२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रियाविषयी कृती कार्यक्रम अभ्यासणे

**विषय विवेचन :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीमुक्तीचे कट्टर समर्थक होते. त्यांच्यावर महात्मा गौतम बुद्धाच्या शिकवणुकीचा आणि महात्मा जोतिबा फुलेंच्या कार्याचा प्रचंड प्रभाव होता. बाबासाहेबांच्या मते बुद्ध हेच स्त्री स्वातंत्र्याचे आद्य पुरस्कर्ते होत. बुद्धानी समानतेचा उपदेश दिला आणि तो अंमलातही आणला. स्त्रियांना धर्मदीक्षेचा अधिकार देणारा बौद्ध धम्म हा मानवी इतिहासातला पहिला धर्म होय.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलित स्त्रीयांना उद्देशून म्हणतात, 'संसारातल्या अडचणी स्त्री पुरुष मिळून सोडवता तसे समाजाच्या संसारच्या अडचणी दोघांनी मिळून सोडवल्या पाहिजेत'. तुम्ही स्त्रियांनी आम्हा पुरुषांना जन्म दिला आहे. ब्राह्मण स्त्रियात जेवढे शील आहे तेवढे तुमच्यात आहे. पातिव्रत्य आहे, मनोधैर्य, करारीपणा आणि धमक आहे. असे असूनही तुमच्या पोटी जन्मलेल्या बालकाला अवमानिले जाते. म्हणूनच समाज उन्नती करण्याचा निश्चय जसा पुरुष करतात तसा तुम्ही केला पाहिजे. जुन्या गलिच्छ चालीरीती सोडल्या पाहिजेत. वरिष्ठ बायका लुगडी नेसतात तशा तुम्ही नेसा. भाराभर कथलाचे व चांदीचे गोठ पाटल्या घालण्यापेक्षा चांगले कपडे घाला. दागिने घालायचे असतील तर सोन्याचे घाला. स्वच्छ रहा. तुम्ही घरच्या गृहलक्ष्मी आहात अमंगल घडणार नाही याची काळजी घ्या. अशा विचारतून त्यांनी स्त्रियांना जगण्याचा हक्क दिला जावा असे मत मांडले आहे.

**स्त्रियांच्या विकासात शिक्षणाची भूमिका महत्वाची :**

बाबासाहेबांच्या मते कोणत्याही समाजाचे मूल्यमापन त्या समाजातल्या स्त्रियांची परिस्थिती कशी आहे यावरून करता येते. समाजाने स्त्रियांच्या विकासाकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याची त्यांची आग्रही भूमिका होती. ही समग्र प्रगती केवळ पुरुषांचीच नव्हे, तर स्त्रियांचीदेखील होणे गरजेचे आहे, हे भान त्यांना विद्यार्थिदशेतच आले होते. ते स्त्री शिक्षणाचे कट्टर पुरस्कर्ते होते. प्रत्येकाने आपल्या घरातल्या मुलीला शिक्षणाची संधी दिली तर हा विचार समाजात सर्वत्र पसरेल. समाजाची प्रगती होण्यासाठी शिक्षणाचा प्रसार व्हायला हवा असे त्यांचे ठाम मत होते. शिक्षणामुळे मुली बिघडतात हा विचार सर्वांनी मनातून काढून टाकला पाहिजे. आईवडिलांनी बालपणापासूनच मुलीच्या शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे. ब्राह्मणाच्या मुली जितक्या शिकतील तितक्या दलितांमधल्या मुली शिकल्या पाहिजेत, असे विचार ते वेळोवेळी मांडत. ते केवळ विचार मांडून थांबले नाहीत, तर औरंगाबादला त्यांनी महाविद्यालयाची स्थापना केली. या महाविद्यालयात मुलींनाही प्रवेश देऊन त्यांनी शिक्षण विषयक विचारच मांडून कृती केलेली आहे.

भारतीय समाज व्यवस्थेत घट्ट रुजलेली विषमता नष्ट करण्यासाठी झटणाऱ्या बाबासाहेबांना स्त्रियांवर होणारे अन्याय- अत्याचार अस्वस्थ करत होते. पितृसत्ताक संस्कृतीचा पगडाही लक्षात येत होता. स्त्रियांचे त्यांच्या मनाविरुद्ध झालेले विवाह आणि लादली जाणारी बाळंतपणे याचाही परिणाम दिसत होता. ही परिस्थिती बदलण्याचे एकमेव प्रभावी साधन म्हणजे शिक्षण, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. हा विचार समाजात रुजण्यासाठी त्यांनी आपल्या लेखांतून-व्याख्यानांतून पोटतिडकीने मांडणी केली.

**कुटुंबनियोजन :**

कुटुंबनियोजनाबाबत डॉ. बाबासाहेब म्हणतात की, जास्त मुलांना जन्म देऊ नये. जास्त मुलं-मुली जन्माला घालणं हा देशामधला राष्ट्रीय गुन्हा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या या विचारातून त्यांचा द्रष्टेपणा दिसून येतो. त्याचबरोबर त्यांनी मांडलेल्या समस्या आजही आपल्या समाजामध्ये पाहायला मिळतात. समाजातील एक घटक म्हणून बाबासाहेबांच्या विचारांचे पाईक म्हणून पुढे जाताना हा विचार आचरणात आणला तर समाजामध्ये बदल होण्यास सुरुवात होईल.

**मजूर मंत्री असताना स्त्रियांच्या हिताचे कार्य :**

स्वतंत्र भारताचे पहिले मजूर मंत्री म्हणून बाबासाहेबांनी स्त्रियांच्या सक्षमीकरणाचे अनेक निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी केली. खाण कामगार स्त्रीला प्रसूती भत्ता, कोळसा खाणीत काम करणाऱ्या स्त्री कामगारांना पुरुषांइतकीच मजुरी, बहुपत्नीत्वाच्या प्रथेला पायबंद, मजूर आणि कष्टकरी स्त्रियांसाठी २१ दिवसांची किरकोळ रजा, एका महिन्याची हक्काची रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि २० वर्षांची सेवा झाल्यावर निवृत्तिवेतनाची तरतूद यांसारख्या महत्त्वाच्या निर्णयांचा उल्लेख करायला हवा. एकूणच संविधानिक समान हक्क, समान संधी, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि इत्तर सर्व अधिकार, स्त्रियांना समान न्याय आणि कायद्याचे मोफत सहाय्य, प्रसूती सहाय्य, कुटुंब नियोजन आग्रह, विद्यार्थीनीना देखील बोर्डिंग मध्ये शिक्षण घेण्याची व्यवस्था, संतती जन्मास घालणे ही स्त्रीची इच्छा, प्रौढ मताधिकारात पुरुषाबरोबरचा हक्क या स्त्री हक्काविषय बाबासाहेबांनी कार्य केले आहे.

**हिंदू कोड बिलासाठी आग्रह :**

बाबासाहेबांनी १९४७ मध्ये कायदा मंत्री असताना हिंदू संहिता विधेयक अर्थात हिंदू कोड बिलाचा प्रस्ताव लोकसभेत मांडला. हिंदू वैयक्तिक कायद्यात एकाच वेळी काही परस्परपूरक पुरोगामी तत्त्वे समाविष्ट करण्याचे त्यांचे हे क्रांतिकारी पाऊल होते. अस्पृश्यतेचे उच्चाटन, लग्नसंबंधातली स्त्री-पुरुष समानता, स्त्रियांना काडीमोड घेण्याचा अधिकार, वारसाहक्काचे लाभ स्त्रियांनाही देण्याची तरतूद या तत्त्वांचा यात समावेश होता. बाबासाहेबांच्या मते सामाजिक न्यायाचा लढा यशस्वी होण्यासाठी हिंदू समाजाच्या वैयक्तिक कायद्यामध्ये जाती व्यवस्था आणि पुरुषप्रधानता यांना नकार देऊन समान वैयक्तिक संबंधांची पायाभरणी करणे आवश्यक होते. दुर्दैवाने या विधेयकाला लोकसभेत प्रचंड विरोध झाला. या विधेयकाला प्रारंभी पंडित नेहरूंचा पाठिंबा होता पण काँग्रेसमधल्या सनातनी मंडळींचा टोकाचा विरोध आणि येऊ घातलेल्या निवडणुकांमुळे नेहरूंना प्रतिगामी शक्तींसमोर हार पत्करावी लागली. बाबासाहेबांना याचा खूप त्रास झाला. शेवटी या मुद्द्यावरून त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा त्याग केला.

संविधानात आर्थिक प्रश्नांवर समान अधिकाराची तत्त्वे समाविष्ट करून अपेक्षित परिणाम होणार नाही, तर त्यासाठी हिंदू संहितेमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे असे डॉ.बाबासाहेबांचे मत होते. जातीय अन्याय आणि स्त्रियांवर होणारे अन्याय यांमागची मूळ कारणे एकमेकांमध्ये गुंतलेली आहेत, याविषयी बाबासाहेब ठाम होते. घटनेला समांतर अशी परिपूर्ण हिंदू संहिता असावी, अशी त्यांची इच्छा होती; पण तसे होऊ शकले नाही. ज्या मतदानाच्या अधिकारासाठी युरोपमधल्या स्त्रियांना संघर्ष करावा लागला तो अधिकार भारतीय स्त्रियांना न मागताच बाबासाहेबांनी दिला. त्यांनी कुटुंबाचे योग्य नियोजन स्त्रियांशीच निगडित असल्याची स्पष्ट भूमिका घेतलेली दिसते.

**स्त्रियांचा चळवळीत सहभाग :**

बाबासाहेबांनी आपल्या चळवळीत स्त्रियांना आवर्जून सहभागी करून घेतले. १९२७ चा महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह, १९३० चा नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह तसेच १९४२ च्या नागपुरातल्या महिला परिषदेत स्त्रिया मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. लग्न ही मुलीच्या प्रगतीमधली अडचण असून मुलीवर ते लादले जाऊ नये, लग्नानंतर पत्नी ही नवऱ्याची मैत्रीण आणि समान अधिकार असलेली सहचारिणी असायला हवी. ती नवऱ्याची गुलाम व्हायला नको, असे ते म्हणत. बायको कशी असावी, याबाबत पुरुषाचे मत घेतले जाते, तद्वतच स्त्रीचेही नवऱ्याविषयीचे मत, आवडी-निवडी विचारत घेतल्या पाहिजेत. अशी स्त्री समाजात, स्त्री हक्क , कौटुंबिक दर्जा या विषयी मौलिक, मार्गदर्शक आणि ठाम वैचारिक भूमिका घेऊन बाबासाहेब स्त्री हक्कासाठी लढले.

**सारांश :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूरमध्ये आयोजित ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस वीमेन्स कॉन्फरन्स मध्ये केलेले भाषण आजही समाजासाठी मार्गदर्शकच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ज्या समाजात स्त्रिया पुढे तो समाज पुढे. ज्या देशात महिलांची प्रगती होते तोच देश प्रगतशील असू शकतो. असा विचार मांडत त्यांनी समाजातील स्त्रियांचं महत्त्व विषद करत देशाच्या प्रगतीमध्ये महिलांचं महत्त्व पटवून दिलं. मात्र आज देशाच्या प्रगतीमध्ये महिलांचा वाटा

NAVJYOT / Vol. XIII / Issue – III ISSN 2277-8063

वाढला असला तरी महिलांना समान हक्क, समान प्रतिनिधित्व, सामाजिक सुरक्षा मिळताना दिसत नाही. त्यामुळं २१ व्या शतकातील भारत महिलांच्या प्रगतीशिवाय महासत्ता होऊ शकत नाही. याची जाणीव बाबासाहेबांचे हे विचार आपल्याला करून देतात.

**संदर्भ सूची :**

1. डॉ. मनोहर यशवंत, "नवसंस्कृतीचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर", नॉलेज मिशन प्रकाशन, औरंगाबाद.
2. डॉ. अहिरे सुनंदा, डॉ. साळुंके उषा, " स्त्री अभ्यासाच्या दिशा", अथर्व पब्लीकेशन, औरंगाबाद
3. प्रा. काळपांडे अनिल, इंगोले प्रदीप, डॉ. खंडारे सुभाष, "सर्वांसाठी बाबासाहेब", सुधीर प्रकाशन वर्धा.
4. डॉ. बी. आर. आंबेडकर, "हिंदू स्त्रियांची उन्नती व अवनती", सुगत प्रकाशन, नागपूर.
5. दिव्य मराठी दैनिक
6. महाराष्ट्र टाईम्स